7th August, 2026

Department of Corporate Services
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai-400001

**BSE Security Code: 533019**

Dear Sir,

**Sub: Regulations 30 and 47 of the listing obligation and Disclosure Requirements Regulations, 2015 - Corrigendum to the Newspaper Publication**

Pursuant to Regulation 30 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we submit herewith Corrigendum of the newspaper publication made on Friday, 7th August, 2026 in Mahasagar Gondia- Marathi, wherein

1) Date mentioned at the third column is inadvertently printed as 30.06.2026 instead of 30.06.2025.
2) Date mentioned at 2nd point in notes is inadvertently printed as 10.05.2025 instead of 03.08.2026
3) Date mentioned at bottom of publication of unaudited financial results is inadvertently printed as 03.08.2023 instead of 03.08.2026

This is for your information and records.

Thanking you,

Yours faithfully,
For **Simplex Papers Limited**
Bikash Singh
Digitally signed by Bikash Singh
Date: 2026.08.07 12:12:59 +05'30'
**Bikash Singh**
**Company Secretary**

Encl.: as above

# अकृषक रूपांतरण आणि सनद अट रद्द होऊनही नागरिकांना त्रास

## भाजप रेलटोली मंडळाने मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन



**प्रतिनिधी / गोंदिया**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार जमिनीचे अकृषक रूपांतरण आणि अकृषक सनद मिळवण्याची अट रद्द करण्यात आली आहे. असे असतानाही गोंदिया नगर परिषद क्षेत्रात नागरिकांना अजूनही अकृषक रूपांतरण करण्यासाठी सांगितले जात असून, यामुळे गोंधळ व प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत. यासंदर्भात भारतीय जनता पार्टी, रेलटोली मंडळाचे अध्यक्ष ऋषिकांत साहू यांनी नगर परिषद गोंदियाचे मुख्याधिकारी यांना आज ६ ऑगस्ट रोजी निवेदन देऊन तात्काळ आवश्यक कारवाई व स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करण्याची मागणी केली आहे.

मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात ऋषिकांत साहू यांनी स्पष्ट केले की, राज्य शासनाच्या नवीन शासन निर्णयानुसार (क्रमांक एनएपी-२०२५/प्र.क्र.१७७/जमीन-०१अ) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी किंवा बांधकाम परवानगी दिल्यास स्वतंत्रपणे अकृषक परवानगी आणि अकृषक सनद घेण्याची अट रद्द करण्यात आली आहे. नियमानुसार विकास परवानगी मिळाल्यानंतर महसूल दप्तरी आवश्यक त्या नोंदी घेतल्या जाणे गरजेचे आहे.

तरीसुद्धा गोंदिया नगर परिषद क्षेत्रातील बहुतांश जमीन अद्यापही महसूल दप्तरी कृषी स्वरूपात नोंदवलेली असून नागरिकांना विविध कामांसाठी जमीन अकृषक करून आणण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार नगर परिषद क्षेत्रात अवलंबल्या जाणाऱ्या प्रक्रियेबाबत स्पष्ट दिशा-निर्देश जारी करण्यात यावेत आणि संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन नागरिकांची नाहक होणारी गैरसोय थांबवावी, अशी मागणी भाजप रेलटोली मंडळाने केली आहे.

या निवेदनाच्या प्रती नगरविकास मंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार तसेच नगररचना विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही योग्य त्या कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. हे निवेदन देतेवेळी नगर परिषदेचे भाजप गट नेते व गोंदिया बाजार मंडळ अध्यक्ष विवेक मिश्रा, नगर परिषदेचे उपाध्यक्ष संतोष पटले, नगर परिषद सभापती प्रदीप (पिंटू) माने, सभापती कैलास यादव, नगरसेवक शिव शर्मा, नगरसेवक शिशिर (गोलू) बिसेन, नगरसेवक राजीव (रिंकू) आसवानी, घनश्याम पानतावने, राहुल वाल्दे, धर्मेश (बेबी) अग्रवाल, शहर सरचिटणीस नितीश शाह, आशिष ठकराणी, राकेश अग्रवाल याच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांची सुटका; पिकअप जप्त!

## १२ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत; गंगाझरी पोलिसांची कारवाई



**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्ह्यात अवैध गोवंश तस्करीविरोधात पोलिसांनी कारवाईचे सत्र सुरू केले आहे. त्यातच गंगाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दरम्यान पोलिसांनी शहरवाणी ते कवलेवाडा मार्गावर नाकाबंदी करून एक विनानंबरचा पीकअप वाहन थांबविले. त्याची तपासणी केली असता जनावरे कोंबून कत्तलीसाठी वाहतूक करीत असल्याचे समोर आले. पोलिसांनी कारवाई करीत १९ जनावरांसह पीकअप वाहन असा एकूण १२ लाखाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई (ता.५) गंगाझरी पोलिसांनी केली.

सविस्तर असे की, गंगाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शहरवाणी ते कवलेवाडा रोडवर पोलिसांनी संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी नाकाबंदी केली होती. दरम्यान, एक संशयित विनानंबरची बोलेरो पिकअप गाडी थांबवून तिची पाहणी केली असता, त्यात अत्यंत क्रुरतेने कोंबून लहान-मोठी ११ गोवंश जनावरे आढळून आली. चालकाला जनावर वाहतुकीचा परवाना विचारला असता कसलाही परवाना नसल्याचे दिसून आले.

या प्रकरणी गंगाझरी पोलिसांनी गुन्हा नोंद करून १ लाख ९५ हजार रुपये किमतीची ११ गोवंश जनावरे आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेली १० लाख रुपये किमतीची विनानंबरची बोलेरो पिकअप असा एकूण ११ लाख ९५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार धीरज राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राकेश भुरे, राजेश राऊत, चित्ररंजनशीह जनेवार, श्रीकांत नागपुरे आणि नितीन चांदेवार यांनी केली आहे.

## दृष्टिक्षेप

### भोंबोळी काढण्याच्या कारणावरून मारहाण

**गोंदिया :** ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत मौजा तुमखेडा खुर्द येथे वाडीतून भोंबोडी काढण्याच्या कारणावरून आरोपीने शिवीगाळ व काठी मारहाण करून फिर्यादीला जखमी केले. ही घटना ४ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. फिर्यादी दुर्गेश शंकर लाडे (३४) रा. तुमखेडा यांच्या वाडीतून आरोपी दुर्गाप्रसाद गेंदलाल गयगये (४८) हा भोंबोडी काढत होता. दरम्यान त्याला हटकल्यावर आरोपीने जागा तूज्या बापाची आहे, असे बोलून शिवीगाळ व काठीने मारहून मारहाण केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### प्रकृती खालावल्याने युवकाचा मृत्यू

**गोंदिया :** आमगाव पोलिस ठाण्यांतर्गत जुनी पाणी टंकीच्या समोर एका ४५ वर्षीय इसमाची प्रकृती खालावल्याने मृत्यू झाला. ही घटना ४ ऑगस्टची आहे. चंद्रकात पुरुषोत्तम पटले (६७) रा. रिसामा असे मृताचे नाव आहे. फिर्यादी अमित सुरेशभाई पटले (४५) रा. जुनी पाणी टाकी यांच्या तक्रारीवरून पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### लायन्स क्लबतर्फे वृक्षारोपण

**गोंदिया :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणेच नव्हे, तर त्यांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने लायन्स क्लब गोंदिया सिव्हिलच्या वतीने स्थानिक सूर्यटोला येथील तुळजा भवानी मंदिर परिसर येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबच्या अध्यक्षा सौ.भावना कदम होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून रिजन चेअरपर्सन सौ.सुजाता बहेकार, पवन कटरे, ज्येष्ठ लायन मुरलीधर माहौरे, केशव ठाकरे, सौ.मंजूषा फूडे, शरद क्षत्रिय, दिलीप चौरगडे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत मंदिर परिसरात आवळा, कळंब, बेल आणि विविध शोभिवंत फुलझाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी सुजाता बहेकार, पवन कटरे, मुरलीधर माहौरे, आणि मंदिर ट्रस्टचे सचिव महेंद्र बढ़े यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### फावड्याच्या दांड्याने हल्ला

**गोंदिया :** शहरातील जयस्तंभ चौक येथे दोन मित्रांत भांडण झाल्याने आरोपीने फावड्याने दांड्याने मारून फिर्यादीला जखमी केले. ही घटना ४ ऑगस्टची आहे. फिर्यादी विकास उर्फ विसु राजेश सोनटक्के (२८) व सुरज अर्जुन सागर २८) रा. उडीया मोहल्ला (सावराटोली) हे दोन्ही मित्र असून घटनेच्या दिवशी सुरजने विकासला आपल्या घराकडे नेले. व माझा मोबाईल तू घेतला, या कारणावरून फावड्याच्या दांड्याने मारून विकासला जखमी केले.

# कमलेश बिसेन यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर



**प्रतिनिधी / गोंदिया**

सन २०२४-२५ या वर्षाचे राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार ५ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आले असून गोंदिया जिल्ह्यातून कमलेश बिसेन यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्हा परिषद स्तरावर अति उत्कृष्ट काम करणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यातून एक ग्रामपंचायत अधिकारी यांना शासन स्तरावरून यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्याच अनुषंगाने सन २०२४-२५ करिता गोंदिया जिल्ह्यातून गोंदिया तालुक्यातील रायपूर ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी कमलेश बिसेन यांचा निवड करण्यात आली आहे.

कमलेश बिसेन हे गोंदिया ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष असून मागील अनेक वर्षांपासून ते संघटनेच्या कामात सक्रिय आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार मंत्री ग्रामविकास व पंचायत राज यांच्या हस्ते यशवंत पंचायत अभियान पुरस्कार वितरण सोहळ्याच्या वेळी वितरीत करण्यात येतो.

# घरफोडी करणारा अट्टल चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

## सहा गुन्ह्यांची उकल; १ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त



**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावत एका अट्टल चोराला जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. या आरोपीकडून अर्जुनी-मोर पोलीस ठाण्यासह भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण सहा गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून, त्याच्याकडून चोरीतील १ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

२८ जुलै रोजी अर्जुनी-मोर पोलीस ठाण्यातील मौजा बोंडगावदेवी येथील केशव प्रकाश झोळे यांनी घरफोडीची तक्रार दाखल केली होती. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ३६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. या प्रकरणी अर्जुनी-मोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे प्रवीण उर्फ डकैत (वय ३०, रा. टिळक वॉर्ड, मोहाडी, जि. भंडारा) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने अर्जुनी-मोर, साकोली, लाखनी, देसाईगंज आणि रामनगर (जि. चंद्रपूर) परिसरातील घरफोडी व चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

आरोपीकडून पोलिसांनी रोख रक्कम २५ हजार रुपये, एक रेडमी कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल (किंमत २५ हजार रुपये) तसेच होंडा सीबी शाईन मोटारसायकल (किंमत ६६ हजार रुपये) असा एकूण १ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीस पुढील तपासासाठी अर्जुनी-मोर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि. अमरदीप खाडे, पोहेकॉ. तुलसीदास लुटे, पोहेकॉ. अमित तिवारी, पोहेकॉ. प्रकाश गायकवाड, पोहेकॉ. हितेंद्रकुमार दाते, पोहेकॉ. रोशन चेरे, पोहेकॉ. योगेश राऊत, पोहेकॉ. देवेंद्र उके, पोहेकॉ. वंदना बिसेन, पोशि. योगेश रहिले, पोशि. अनिकेत चांदवाडे व अर्पण बजारी यांच्या पथकाने केली.

# पहिल्याच पावसात देवलगाव-कवठा रस्त्याला लागले ग्रहण



**प्रतिनिधी / अर्जुनी-मोर**

तालुक्यातील देवलगाव-कवठा-कालीमाती-प्रतापगड-घोटणगाव हा अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा मार्ग यावर्षीच्या पहिल्याच पावसात धोकादायक बनल्याचे चित्र समोर आले आहे. रस्त्यावरील पूल, नाले व अनेक ठिकाणी रस्त्याचे अस्तित्वच धोक्यात आल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

देवलगाववरून कवठ्याकडे जाताना पहिल्याच नाल्यावरील पुलाला दोन मोठी भगदाडे पडली असून त्यामुळे कधीही गंभीर अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. याशिवाय पुलाच्या दोन्ही बाजूंनी रस्ता वाहून गेला असल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

यापुढे डोंगरगाव तलावाच्या चांदव्यातून येणाऱ्या पाण्याच्या नाल्यावर असलेल्या पुलावरही मोठमोठे खड्डे पडले आहेत. सतत सुरू असलेल्या पावसामुळे हा पूलही वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. देवलगाव ते डोंगरगाव आणि पुढे कवठ्यापर्यंत संपूर्ण रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे.

विशेष म्हणजे, देवलगाव ते डोंगरगाव हा रस्ता जिल्हा परिषदेकडे असून त्याची देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे आहे. तर डोंगरगाव ते कवठा-कालीमाती-प्रतापगड-गोटणगाव हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, अर्जुनी मोरगाव यांच्या अखत्यारीत येतो. दोन विभागांच्या सीमारेषेत अडकलेल्या या महत्त्वाच्या मार्गाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

या मार्गावरून दररोज शेकडो विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, व्यापारी तसेच प्रतापगड व घोटणगाव परिसरातील पर्यटनस्थळांना आणि धार्मिक स्थळांना भेट देणारे पर्यटक व भाविक प्रवास करतात. मात्र रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था पाहता त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नागरिकांनी जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून तातडीने भगदाडे बुजवावीत, पूल सुरक्षित करावेत तसेच संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती युद्धपातळीवर हाती घ्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# श्री हनुमंत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आजपासून

**प्रतिनिधी / गोंदिया**

श्रावण महिन्याचे पावन औचित्य साधून गोंदिया शहरातील शास्त्री वॉर्ड येथील सिद्ध हनुमान महाराज मंदिर प्रांगणात ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान तीन दिवसीय भव्य 'श्री हनुमंत कथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक ज्ञानयज्ञामुळे संपूर्ण शास्त्री वॉर्ड परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहावयास मिळत आहे. कार्यक्रमाची सुरुवात ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता 'गौर भवन चौक' येथील श्री त्रिमूर्ती गजानन मंदिर येथून महिलांची भव्य कलश यात्रा निघेल. मंतर चौक मार्गे दुपारी १२:३० वाजता ही शोभायात्रा शास्त्री वाडार्तील सिद्ध हनुमान महाराज मंदिर प्रांगणात पोहोचेल. ७ ते ९ ऑगस्टः दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत 'श्री हनुमंत कथा', १० ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संगीतमय रुद्राभिषेक, हवन व विशेष पूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# न्याय द्या, अन्यथा गोंदिया-भंडारा छत्तीसगडला जोडा!

## धानाला ३,५०० रुपये हमीभाव; बोनस आणि थकीत देयके देण्याची मागणी



**प्रतिनिधी / नवेगावबांध**

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या वाढत्या आर्थिक अडचणी आणि शासनाच्या कथित दुर्लक्षाविरोधात अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघटनेने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. संघटनेचे अध्यक्ष ललितकुमार बाळबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी, अर्जुनी/मोर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. 'गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय देता येत नसेल, तर हे दोन्ही जिल्हे थेट शेजारच्या छत्तीसगड राज्याला जोडण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावा,' अशी थेट मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये खते, बियाणे व डिझेलचे दर समान असताना छत्तीसगड सरकार धानाला अधिक दर, बोनस व विविध सवलती देते. याउलट महाराष्ट्रातील बळीराजा वाढत्या उत्पादन खर्चामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे राज्य शासनाने धानाला प्रतिक्विंटल किमान ३,५०० रुपये हमीभाव जाहीर करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. याशिवाय, प्रामाणिकपणे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदानाची स्वतंत्र यादी तातडीने जाहीर करावी, तसेच नवीन हंगामासाठी धान बोनसची स्पष्ट घोषणा करावी, असा आग्रह धरण्यात आला आहे.

सध्या रोवणीचा हंगाम सुरू असताना आधारभूत केंद्रावर विकलेल्या धानाचे थकीत चुकारे १६ दिवसांनंतरही न मिळाल्याने शेतकरी पुन्हा सावकारी किंवा इतर कर्जाच्या विळख्यात अडकत आहेत. त्यामुळे थकीत रकमा तातडीने बँक खात्यात जमा करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र लोकशाही आंदोलन उभारण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला असून, या निवेदनावर ललितकुमार बाळबुद्धे, शंकरजी लोगडे, घनश्यामजी भेंडारकर, गोवर्धन डोंगरवार, दुलीचंद लांजेवार, डोये महाराज, आशिष आरसोडे, नंदकिशोर गहाणे, नरेश खंडाईत, दिगंबर कापगते, लालाजी कापगते, आनंदराव लाडे व राजू राऊत आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहिर सुचना

श्री.स्व.देवराम उर्फ देविदास तानुजी गजभिये इनके नाम से नगर परिषद रिकार्ड मे नाम दर्ज है. जिसका वार्ड क्रमांक-१७, वार्ड का नाम-शास्त्री वार्ड गोंदिया, मालमत्ता क्रमांक- १०/४६० है. उक्त मालमत्ता धारक का निधन दिनांकः- ०८/०७/२००५ को हो चुका है. इनके निधन उपरांत इनके वारस १) श्रीमती लक्ष्मी वासूदेव श्यामकर, २) श्री.मुरलीधर देविदास गजभिये, ३) श्री.महेंद्र देविदास गजभिये, अ) श्रीमती अंबिका महेंद्र गजभिये, ब) रूचा महेंद्र गजभिये, क) पूजा महेंद्र गजभिये, ड) प्रणय महेंद्र गजभिये, ४) श्री.जितेंद्र देविदास गजभिये, अ) श्रीमती शिला जितेंद्र गजभिये, ब) नितीन जितेंद्र गजभिये इन्होंने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है. हस्तांतरण पर आक्षेप हो तो या सुचना प्रकाशित होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय मे प्रमाणित दस्तावेज सहित सादर करेंगे. आक्षेप प्राप्त न होने पर हस्तांतरण की कार्यवाही की जाएगी.

**मुख्य अधिकारी**
नगर परिषद गोंदिया

## शुद्धिपत्रक

सिम्प्लेक्स पेपर कंपनी लिमिटेडच्या दिनांक ०४.०८.२०२६ रोजी प्रकाशित झालेल्या जाहिराती मधील तक्त्यांमध्ये तिसऱ्या स्तंभात नमूद केलेली तारीख 'तिमाही संपली ३०.०६.२०२६ (अलेखापरीक्षित)' ऐवजी 'संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ (अलेखा-परीक्षित)' अशी वाचावी. त्याच बरोबर संचालक मंडळाची बैठक दिनांक १० मे २०२३ ऐवजी ०३ ऑगस्ट २०२६ वाचावे. व खालील दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ ऐवजी ०३ ऑगस्ट २०२६ वाचावे.

ही चूक अनवधानाने झाली असून, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

Sealed and superscripted tender offers are invited online from Reputed Firms/Contractors / Manufacturers/Company, etc. Tender for Supply of Stationary & Printing Material. Estimated Amount Rs. 5.00 Lakhs. The details of E-Tender No. **SE/BHR/HR/26-27/Stationary/T-05, Dt.07.08.2026.** is available at our website **https://etender.mahadiscom.in/eatApp** Sale closing date: 17.08.2026, The last date of submission is 17.08.2026 upto 15.00 Hrs., Date of opening of Technical Bid is 17.08.2026, 15.00 hrs if possible. Any changes in the Tender Schedule, corrigendum etc. shall be published on our website only.

PRO NO-17

**Superintending Engineer,
O & M Circle, MSEDCL, Bhandara.**

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

### नागपूर मंडळात यार्डची पुनर्बांधणी साठी ई-निविदा

**निविदा संख्या:** CEC-NGP-26-27-08
दिनांक: 31.07.2026
**कार्य चा नाव:** दक्षिण पूर्व मध्य रेल्वे च्या नागपूर मंडळात गोंदिया-जबलपूर दुहेरी-करणाच्या कार्य निमित्त नैनपूर, बिनाईकी आणि गढा येथे यार्डची पुनर्बांधणी आणि इतर अभियांत्रिकी कार्य.
**निविदा मूल्य:** ₹ 80,46,56,999/-, **बयाणा रक्कम:** ₹ 1,60,93,100/-, **निविदा दस्त-ऐवजाची किंमत:** ₹ 0/-, **कार्य ची कालावधी:** मंजुरी पत्राच्या तारखेपासून 24 (चोवीस) महिने.
**निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** दिनांक **28.08.2026** च्या **15:00** वाजेपर्यंत
**निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** दिनांक **28.08.2026** ला **15.30** वाजता.
वरील कार्य संबंधी संपूर्ण तपशिल, निविदा दस्तऐवज, पात्रता निकष साठी मुख्य प्रकल्प प्रबंधक, पश्चिम कार्यालय/बांधकाम/द.पू.म.रेल्वे /नागपूर (पिन: 440001) किंवा उप मुख्य अभियंता (बांधकाम-III)/द.पू.म. रेल्वे/गोंदिया यांच्या कार्यालयाशी संपर्क साधा किंवा वेब-साइट **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

**उप मुख्य अभियंता/बांधकाम-III,
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, गोंदिया**

AIM/32-77

स्वच्छ भारत अभियान
एक कदम स्वच्छता की ओर

## जाहीरनामा

प्रस्तुत जाहीरनाम्याव्दारे सर्व जनतेला सुचीत करण्यात येते की, **अर्जदार श्री/श्रीमती. संपत कैकाळु मेश्राम (भाऊ) रा.बोंडगाव/सुर यांनी त्यांचा भाऊ गणपत कैकाळु मेश्राम रा. बोंडगाव/सुर ता. अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया** यांचे जन्म दिनांक 06/04/1950 रोजी मौजा बोंडगाव/सुर येथे झालेला असुन, त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय बोंडगाव/सुर ता. अर्जुनी मोर/ जि. गोंदिया येथे झालेली नाही. त्यामुळे शासकिय कामाकरीता त्यांच्या जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे **श्री/श्रीमती.संपत कैकाळु मेश्राम (भाऊ) रा. बोंडगाव/सुर यांनी त्यांचा भाऊ गणपत कैकाळु मेश्राम रा.बोंडगाव/सुर ता.अर्जुनी मोरगाव जि.गोंदिया** यांचे **जन्म दिनांक 06/04/1950** ची नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय, बोंडगाव/सुर ता.अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया येथील रेकार्डवर घेण्याचा आदेश मिळण्याबाबत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११(३) अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

सबब अर्जदार **श्री. श्रीमती. संपत कैकालु मेश्राम (भाऊ) रा.बोंडगाव/सुर यांनी त्यांचा भाऊ गणपत कैकाळु मेश्राम रा-बोंडगाव/सुर ता.अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया** यांची **जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बोंडगाव/सुर ता. अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया** येथे करण्याचे संबधात कोणाचेही **आक्षेप/हरकती** किंवा हितसंबध असल्यास, त्यांनी आपला आक्षेप अर्ज **दिनांक -12/08/2026** च्या आत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहसिलदार अर्जुनी/मोर यांचे कार्यालयात सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
**(अनिरुध्द कांबळे)
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार अर्जुनी मोरगांव**